■ वर्ष- १२ ■ अंक- ३८ ■ मुंबई, मंगळवार,०४ ऑगस्ट २०२६ ते १० ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

'भेदाभेद भ्रम अमंगळ' ते 'लव्ह जिहाद': वारी आणि कीर्तनांत 'हिंदुत्व' कसं आलं?

3 → पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण नको!

3 वर्षांची असताना गिळलं टोपण... ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

'आई पोट दुखतंय', 10 वर्षाच्या मुलीची आईकडे तक्रार, सत्य समोर आल्यानंतर हादरले...

60 वर्षांच्या नराधमाकडून तिच्यासह बहिणींवर लैंगिक अत्याचार

पुणे। महिला अत्याचाराच्या घटनांत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. नसरापूर हत्याकांड प्रकरणाची घटना ताजी असतानाच पिंपरी-चिंचवड येथे एक भयंकर घटना उघडकीस आली आहे. एका 60 वर्षांच्या नराधमाने दोन सख्ख्या बहिणींवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीच्या घराशेजारीच राहणाऱ्या दोन सख्ख्या बहिणींवर त्याने वारंवार लैंगिक अत्याचार केला. गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून हा प्रकार सुरू होता. इतकंच नव्हे तर अत्याचारानंतर नराधम पीडित मुलींना पोट कापायची धमकी द्यायचा. यामुळं पीडित मुली घाबरल्या होत्या. पीडित मुलींपैकी एका मुलीच्या पोटात वारंवार दुखू लागल्या नंतर तिच्या कुटुंबियांना ही धक्कादायक घटना कळाली आहे. या प्रकरणात पीडित मुलींच्या कुटुंबीयांनी आणि संतप्त नागरिकांनी नराधमाविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी काल रात्री वाकड पोलीस स्टेशनमध्ये मोठी गर्दी केली होती. त्यानंतर वाकड पोलिसांनी नराधमाला ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलींचे कुटुंबीय तसेच आरोपीचे कुटुंब मजुरीचे काम करतात. घटनेच्या दिवशी घरातील सर्व जण कामावर गेली होती. यावेळी चौथीतील 10 वर्षांची मुलगी आणि तिची 4 वर्षांची लहान बहीण दोघीच घरी होत्या. त्याचवेळी आरोपीने 10 वर्षांच्या चिमुरडीला बळजबरीने स्वतःच्या घरात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. तसंच, तिला धमकीदेखील दिली होती. दरम्यान, पीडित मुलींपैकी एका मुलीच्या पोटात वारंवार दुखू लागल्या नंतर तिच्या कुटुंबियांना ही धक्कादायक घटना कळाली आहे. तसंच, मोठ्या मुलीने घरात आजीला सांगितल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. धक्कादायक म्हणजे, आरोपीने 10 वर्षांच्या मुलीवर मे ते जुलै 2026 या कालावधीत अनेकदा अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसंच, कोणाला काही सांगितल्यास चाकूने पोट चिरण्याची धमकी देऊन आरोपीने अत्याचार केला आहे. काही महिन्यांपूर्वी पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या गाजलेल्या प्रकरणात आरोपी भीमराव कांबळे याला न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली... 62 वर्षीय भीमराम कांबळे याने चिमुकलीवर अत्याचार केले आणि तिची हत्या केली. आता देखील 60 वर्षाच्या नराधमाने दोन सख्या बहिणींवर अत्याचार केल्याची घटना समोर येत आहे, ही घटना पिंपरी चिंचवड शहरातील वाकड परिसरामध्ये घडली आहे. एका 60 वर्षाच्या नराधमाने दोन सख्या बहिणींवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची आल्याची धक्कादायक घटना समोर येत आहे. या दोन सख्या बहिणींचं वय मिळालेल्या माहितीनुसार, 10 आणि 5 वर्ष आहे. घडलेल्या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणात पीडित मुलींच्या कुटुंबीयांनी आणि संतप्त नागरिकांनी नराधमाविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी सोमवारी रात्री वाकड पोलीस स्टेशनमध्ये मोठी गर्दी केली होती. त्यानंतर वाकड पोलिसांनी नराधमाला ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. घटना कशी आली समोर... मुली घरात आई झ्र वडील, आजी - आजोबा यांच्यासोबत राहतात, तर शेजारी राहत असलेला नराधम बायको आणि मुलासोबत राहत असल्याची माहिती समोर येत आहे. पीडितेचे आई-वडील, आजी -आजोबा असे सगळेच कामासाठी बाहेर केले... तर नराधमाची बायको आणि मुलगा देखील मजुरीसाठी घराबाहेर पडले. तेव्हा 10 वर्षांची मुलगी कपडे धुण्यासाठी घराबाहेर आली, तेव्हा आजूबाजूला कोणी आहे की नाही पाहताच, नराधम पीडितेचे तोंड दाबून लगतच्या स्वतःच्या घरी घेऊन गेला. घडत असलेला हा सर्व प्रकार शेजारी राहणाऱ्या महिलेने पाहिला आणि पीडितेच्या आईला सांगितला. त्यानंतर पीडितेला विचारल्यानंतर धक्कादायक सत्य समोर आलं... नराधमाने पहिल्यांदाच असं कृत्य केलं नव्हतं. याआधी मे महिन्यात पहिल्यांदा त्यानंतर तीन वेळा.. असं चार वेळा नराधमाने 10 वर्षीय मुलीवर तोंड दाबून अत्याचार केले. एवंढच नाही तर, कुटुंबियांना तेव्हा मोठा धक्का बसला जेव्हा पीडितेने सांगितलं की, पाच वर्षीय बहिणीवर देखील नराधमाने तोंड दाबून अत्याचार केले. सध्या याप्रकरणी पोलीस पुढील चौकशी करत आहेत.



पिंपरी चिंचवड शहरातील वाकड परिसरामध्ये एक अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. एका 60 वर्षाच्या नराधमा कडून 10 आणि 5 वर्षाच्या दोन सख्या बहिणींवर वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

बनावट SIR लिंक पाठवून गंडा; निवृत्त डॉक्टरची ६.७१ लाखांची फसवणूक

मुंबई : मतदार यादीच्या विशेष तपासणी मोहिमेचा आधार घेत सायबर गुन्हेगार नागरिकांची फसवणूक करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बनावट मतदार पडताळणी लिंक पाठवून एका ७७ वर्षीय निवृत्त भाभा अणुसंशोधन केंद्रातील निवृत्त डॉक्टरची तब्बल ६.७१ लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली.

निवृत्त डॉक्टरची ६.७१ लाखांची फसवणूक

डॉ. प्रताप रामचंद्र बोंगीरवार (मानखुर्द) यांनी नुकताच मतदार तपासणीसाठीचा अर्ज भरला होता. त्यानंतर २९ जुलै रोजी डॉ. बोंगीरवार यांच्या मोबाईलवर एक एसएमएस आला. त्यात या अजार्बाबत निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्याशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले होते आणि त्यासाठी एक मोबाईल क्रमांक देण्यात आला होता. दुसऱ्या दिवशी त्यांनी त्या क्रमांकावर संपर्क साधला असता, समोरील व्यक्तीने स्वतःला निवडणूक आयोगाचा अधिकारी असल्याचे सांगितले. अजार्तील त्यांच्या नावात आणि वडिलांच्या नावात तफावत असल्याचा दावा करून ती दुरुस्त करण्यासाठी ऑनलाइन पडताळणी करावी लागेल, असे सांगण्यात आले.

त्यानंतर आरोपीने व्हॉट्सॲपवर कथित मतदार पडताळणी संकेतस्थळाची लिंक पाठवली आणि त्यावरून एसआयआर फॉर्म डाउनलोड करून प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले.



लिंकवर विश्वास ठेवून डॉ. बोंगीरवार यांनी संकेतस्थळ उघडले आणि आधार क्रमांक, मतदार ओळखपत्र क्रमांक तसेच इतर वैयक्तिक माहिती भरली. त्यानंतर पडताळणी शुल्क म्हणून ₹ ५ भरण्यास सांगण्यात आले.

सुरुवातीला त्यांनी बँक खात्याचा तपशील भरून पैसे भरण्याचा प्रयत्न केला. व्यवहार पूर्ण न झाल्याचे दिसताच आरोपीने क्रेडिट कार्डद्वारे पुन्हा प्रयत्न करण्यास सांगितले. दुसऱ्यांदाही व्यवहार अयशस्वी झाल्याचे दिसले. मात्र त्याचवेळी त्यांच्या मोबाईलवर अनेक वन-टाइम पासवर्ड संदेश येऊ लागल्याने त्यांना संशय आला.

फोन तात्काळ बंद करून त्यांनी बँकेचे व्यवहार तपासले असता, त्यांच्या बँक खात्यातून आणि क्रेडिट कार्डमधून ₹६,७१,००६ रक्कम फसवणुकीने काढल्याचे आढळले. या रकमेतील काही भाग एटीएममधूनही काढण्यात आला होता.

घटना लक्षात येताच डॉ. बोंगीरवार यांनी त्वरित राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन १९३० वर संपर्क साधून तक्रार नोंदवली. त्यानंतर ट्रॉम्बे पोलीस ठाण्यातही गुन्हा दाखल करण्यात आला.

नागरिकांसाठी पोलिसांचा इशारा

पोलीसांनी नागरिकांना मतदार पडताळणी किंवा रक्कप्रक्रियेसंदर्भात येणाऱ्या अनोळखी कॉल, एसएमएस किंवा व्हॉट्सॲप संदेशांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे. रक्क संदर्भातील सर्व प्रक्रिया फक्त निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरूनच कराव्यात. तसेच कोणत्याही परिस्थितीत बँक खाते, डेबिट/क्रेडिट कार्डची माहिती किंवा डळढ अनोळखी व्यक्तींशी शेअर करू नये, असेही पोलीसांनी स्पष्ट केले आहे.

'माझ्यासोबत शारीरिक संबंध ठेव, नाहीतर...' नुकत्याच रुजू झालेल्या शिक्षिकेसोबत काय घडलं?



नव्यानेच कॉलेजमध्ये रुजू झालेल्या शिक्षिकेकडे शारीरिक संबंध ठेवण्यासाठी दबाव टाकण्यात आला. यानंतर शिक्षिकेनं काय पाऊल उचललं? मुझफ्फरनगरमधील ही घटना नेमकी काय आहे, जाणून घेऊया.

मुंबई । एका शासकीय अनुदानित मुलींच्या इंटर कॉलेजच्या मॅनेजरवर नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षिकेसोबत असभ्य वर्तन केल्याचा आणि शारीरिक संबंध ठेवण्यासाठी दबाव आणल्याचा गंभीर आरोप झाला आहे. पीडित शिक्षिकेच्या तक्रारीवरून पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी मॅनेजरला अटक केली आहे. ही घटना समोर आल्यानंतर इतर शिक्षिकांमध्येही तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर येथील ही घटना आहे.

'शारीरिक संबंध ठेव' : पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित शिक्षिकेची नुकतीच या कॉलेजमध्ये नियुक्ती झाली होती. आपल्या जॉइनिंगशी संबंधित औपचारिक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी त्या कॉलेजच्या कार्यालयात गेल्या होत्या. आरोप आहे की, याच दरम्यान कॉलेजचा मॅनेजर अरविंद कुमार याने आपल्या पदाचा गैरवापर करत शिक्षिकेवर शारीरिक संबंध ठेवण्यासाठी दबाव टाकला. शिक्षिकेने या गोष्टीला ठाम विरोध केला आणि नंतर घडलेल्या सर्व प्रकाराची पोलिसांत तक्रार नोंदवली.

आरोपीला अटक : शिक्षिकेच्या तक्रारीच्या आधारे नवी मंडी पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला. प्रकरणाचा तपास सुरू झाल्यानंतर पोलिसांनी आरोपी मॅनेजर अरविंद कुमार याला शनिवारी (25 जुलै) अटक केली. तक्रारीत केलेल्या आरोपांच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जात असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

जबाब नोंदवले जाणार : पोलीस अधिकाऱ्यांनुसार, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केली जात असून तक्रारीतील सर्व आरोपांची छाननी केली जाईल. तपासादरम्यान उपलब्ध पुरावे आणि संबंधित व्यक्तींचे जबाब नोंदवले जाणार आहेत. तपासात जी काही तथ्ये समोर येतील, त्यांच्या आधारे पुढील कायदेशीर पावले उचलली जातील, असे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी पोलीस करत आहेत.

पोलीस प्रशिक्षणार्थीवर कंडोम फेकलं

व्हिडिओ बनवल्याचा आरोप

पोलीस प्रशिक्षणार्थीनं मारहाणीसह आपल्या अंगावर कंडोम फेकल्याचे गंभीर आरोप केले आहेत. नंतर तिला ब्लॅकमेल करत गुप्तांगाचा व्हिडिओ देखील काढल्याचा आरोप पीडितेनं केला होता.

बीड। पोलीस प्रशिक्षणार्थीनं मारहाणीसह आपल्या अंगावर कंडोम फेकल्याचे गंभीर आरोप केले आहेत. नंतर तिला ब्लॅकमेल करत गुप्तांगाचा व्हिडिओ देखील काढल्याचा आरोप पीडितेनं केला होता. हा लज्जास्पद प्रकार हैदराबाद येथील वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकॅडमीत घडला होता. पोलिसांनी आरोपी आयपीएस पीडित प्रशिक्षणार्थी तरुणीविरोधात कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. ही घटना हैदराबादमधील असून या घटनेनं परिसर हादरून गेला आहे.

पीडित तरुणीच्या बॅचमेंटकडून तिचा मानसिक छळ

देशातील सर्वात प्रतिष्ठित पोलीस प्रशिक्षण असलेल्या हैदराबाद येथील एसव्हीपीएनपीए येथून हा धक्कादायक प्रकार उघडकीस आलेला आहे. पीडित तरुणीचा बॅचमेट उदय कृष्णा रेड्डी याने अनेक आठवड्यांपासून तिचा मानसिक छळ करण्यास सुरूवात केली होती. संबंधित प्रकरणाचा आरोपीवर गुन्हा दाखल करून पुढील तपास करण्यात आला होता.

पीडितेवर कंडोम पाकिटे फेकून, गैरवर्तन

पोलिसांच्या तक्रारीनुसार, 23 जून रोजी हा छळ करण्यात आला होता. आरोपी उदय कृष्णा आने महिला अधिकाऱ्याला व्हॅट्सॲपवर अश्लील मेसेज देखील पाठवण्यात आले. तिचा गळा दाबण्याचा प्रयत्न देखील केला आणि गळ्याचा चाकू लावला होता. यानंतर आरोपीने पीडितेवर कंडोमची पाकिटे फेकली होती, दुसऱ्याच दिवशी तिच्याशी गैरवर्तन देखील केले होते. महिला अधिकाऱ्याच्या तक्रारीच्या आधारे, हैदराबाद पोलिसांनी आरोपी उदय कृष्णा विरोधात भारतीय दंड संहिताच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. संबंधित प्रकरणाचा पोलीस पुढील तपास करत आहेत.

तरूणी तरूणासोबत कॅफेत

फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर संपवलं जीवन

अल्पवयीन मुलीने मंगळवारी आपल्या घरात गळफास लावून जीवन संपवलं. कुटुंबीयांनी आरोप केला की, तरुणी ही एका तरूणासोबत एका कॅफेत आढळून आली होती. त्यानंतर त्या तरूणीचे काही फोटो आणि व्हिडिओ मोबाइलमध्ये कैद करण्यात आले होते, नंतर सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले.

बीड। उत्तर प्रदेशातील बरेलीतील बिथरी चैनपुर परिसरातील रहिवासी असलेल्या अल्पवयीन मुलीने मंगळवारी आपल्या घरात गळफास लावून जीवन संपवलं. कुटुंबीयांनी आरोप केला की, तरुणी ही एका तरूणासोबत एका कॅफेत आढळून आली होती. त्यानंतर त्या तरूणीचे काही फोटो आणि व्हिडिओ मोबाइलमध्ये कैद करण्यात आले होते, नंतर सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले. कुटुंबीयांचं म्हणणं असं की, पीडितेनं या घटनेनं नैराश्यात येऊन जीवन संपवलं.

तरूणी कॅफेत तरूणासोबत

घडलेल्या घटनेनुसार, मुलगी ही बरेलीच्या इज्जतनगर येथील ब्लू डायमंड कॅफेत पोहोचली होती. त्या तरुणासोबत इतर दोन मुले देखील होती. जेव्हा त्यांचा दुसरा साथीदार घटनास्थळी निगराणी करत होता. या घटनेची माहिती काही संघटनांना समजली असता, परिस्थिती बिघडून गेली. इतक्यातच मुलगी आणि तिच्यासोबत असलेले काही तरूण घटनास्थळावरून निघून गेले. याचदरम्यान मुलीचा आणि तरूणाचे फोटो आणि व्हिडिओ रेकॉर्ड करण्यात आला. नंतर तोच व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आला. मृत तरूणी एका क्लिनिकवर काम शिकवण्यासाठी जात होती. तिच्या नातेवाईकांनी आरोप केला की, क्लिनिकवर काम करण्यास जात होती. कुटुंबीयांचं म्हणणे असे की, क्लिनिकच्या मालकीनीशी संवाद साधला असता, तिने आपण क्लिनिकवर असल्याचं सांगितलं. मात्र, ती त्या ठिकाणी नव्हती, तिने सांगण्यापासून काहीतरी लपवून ठेवलं होतं.

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर तरूणीन संपवलं जीवन

कुटुंबीयांनी आरोप केला, सोशल मीडियावर फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर तरुणी नैराश्यात गेली. मंगळवारी रात्री तिने घरात गळफास घेत जीवन संपवलं. बऱ्याच वेळानंतर खोलीचा दरवाजा न उघडल्याने कुटुंबीयांना भलताच संशय निर्माण झाला. त्यानंतर कुटुंबीयांनी दरवाजा तोडला होता. तेव्हा कुटुंबीयांना तरुणी लटकलेल्या स्वरुपात दिसून आली होती.



वर्दीला डाग, लग्नाचं आमिष दाखवून पोलिसाकडून तरुणीवर अत्याचार

लग्नाचं आमिष दाखवून एका पोलीस अधिकाऱ्याने महिलेवर लैंगिक अत्याचार केला. तक्रार दाखल केल्यानंतर पोलीस विभागाने आरोपी कॉन्स्टेबल विरोधात कारवाई केली. नंतर आरोपी कॉन्स्टेबलला निलंबित करण्यात आलेले आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी काही पोलीस पथक शोध घेत आहेत.

मुंबई । लग्नाचं आमिष दाखवून एका पोलीस अधिकाऱ्याने महिलेवर लैंगिक अत्याचार केला. तक्रार दाखल केल्यानंतर पोलीस विभागाने आरोपी कॉन्स्टेबल विरोधात कारवाई केली. नंतर आरोपी कॉन्स्टेबलला निलंबित करण्यात आलेले आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी काही पोलीस पथक शोध घेत आहेत. आरोपी फरार असल्याचे सांगितले जात आहे. ही घटना उत्तर प्रदेशातील देवरिया जिल्ह्यातील आहेत.

लग्नाचे वचन देत पोलिसाकडून तरुणीवर लैंगिक अत्याचार

एका वृत्तमाध्यमानुसार, आरोपीची ओळख शैलेंद्र यादव अशी समोर आली आहे. जो उत्तर प्रदेश सेवेचा सदस्य अशी ओळख पटली. त्याच्यावर एका महिलेला लग्नाचे वचन देत तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला. नंतर तिने लग्नासाठी तगादा लावला तेव्हा त्याने लग्नास नकार दिला. संबंधित प्रकरणात पीडितेनं पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

आरोपी कॉन्स्टेबल तात्काळ निलंबित

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून आरोपीची ओळख शैलेंद्र यादव उपी-112 सेवेचा सदस्य असल्याची ओळख पटली होती. एका महिलेला त्याने लग्नाचे वचन दिले होते, असं सांगितलं मात्र, नंतर तिने शरीरसंबंध ठेवल्याचा आरोप केला. नंतर पीडितेनं पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून देवरियाचे पोलीस अधीक्षक अभिजीत आर. शंकर यांनी आरोपी कॉन्स्टेबलला तात्काळ निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले होते. निलंबनाकरताना शैलेंद्र यादव बरहाज पोलीस ठाणे परिसरात कार्यरत होता. तो मूळचा गाझीपूर जिल्ह्यातील आहे. अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुनील सिंह यांनी याबाबत सांगितलं की, पीडितेच्या तक्रारीच्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू ठेवण्यात आलाय.



डीएनए रिपोर्टने उलगडा, सख्खा भाऊ निघाला बाळाचा बाप, निर्दोष तरुणावरील गुन्हा कोर्टाने केला रद्द

डीएनए अहवालात आरोपी निर्दोष असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर उच्च न्यायालयाने बलात्कार आणि पॉक्सो प्रकरणातील एफआयआर रद्द केली. न्यायालयाने पुराव्यांच्या आधारे महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

मुंबई । हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाने अत्यंत संवेदनशील आणि गुंतागुंतीच्या कायदेशीर प्रकरणात महत्त्वाचा निर्णय देत बलात्कार आणि पॉक्सो कायद्यांतर्गत दाखल करण्यात आलेली एफआयआर रद्द केली आहे. न्यायमूर्ती राकेश कैंथला यांच्या एकलपीठाने दिलेल्या निर्णयात स्पष्ट करण्यात आले की, वैज्ञानिक पुराव्यांमधून आरोपी पूर्णपणे निर्दोष असल्याचे सिद्ध झाले असल्यास त्याला फौजदारी खटल्याची मानसिक आणि कायदेशीर छळवणूक सहन करण्यास भाग पाडता येणार नाही. त्यामुळे संबंधित आरोपीविरुद्ध दाखल करण्यात आलेली एफआयआर न्यायालयाने संपूर्णपणे रद्द केली.

बलात्कार केल्याचा आरोप, पण तरुण निर्दोष, भावानेच ठेवले संबंध

या प्रकरणाची सुरुवात बिलासपूर जिल्ह्यात झाली होती. 2023 मध्ये बिलासपूर जिल्ह्यातील महिला पोलीस ठाण्यात एका अल्पवयीन मुलीच्या जबाबाच्या आधारे आयुष नावाच्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम 376 (बलात्कार), कलम 506 (जीवे मारण्याची धमकी) तसेच पॉक्सो कायद्याच्या कलम 6 अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला होता. तक्रारीमध्ये संबंधित मुलीने 9 मार्च 2023 रोजी आयुषने तिच्या घरात घुसून तिच्यावर बलात्कार केला तसेच ही बाब कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला होता. या घटनेमुळे ती गर्भवती झाली आणि तिने एका बाळाला जन्म दिल्याचाही दावा तक्रारीत करण्यात आला होता.

डीएनए नवजात बाळाशी जुळत नसल्याचे स्पष्ट

मात्र पोलीस तपासादरम्यान प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. पीडित मुलगी, नवजात बाळ आणि आरोपी आयुष यांचे नमुने फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीकडे डीएनए तपासणीसाठी पाठवण्यात आले. या तपासणीत आयुषचा डीएनए नवजात बाळाशी जुळत नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर इतर संशयितांचे डीएनए नमुने तपासण्यात आले. त्या तपासणी अहवालात धक्कादायक बाब समोर आली. अहवालानुसार, पीडित मुलीचाच सख्खा भाऊ नवजात बाळाचा जैविक पिता असल्याचे निष्पन्न झाले. या वैज्ञानिक पुराव्यामुळे प्रकरणातील सुरुवातीच्या आरोपांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. फॉरेन्सिक अहवाल समोर आल्यानंतर संबंधित मुलीने पोलिसांसमोर पूरक जबाब नोंदवला. या नव्या जबाबात तिने तिच्या सख्ख्या भावानेच तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवले असल्याची कबुली दिली. डीएनए अहवाल आणि पीडितेच्या बदललेल्या जबाबाचा विचार करून न्यायालयाने आयुषविरुद्ध करण्यात आलेले सर्व आरोप निराधार असल्याचे मान्य केले. वैज्ञानिक पुरावे आरोपीच्या निर्दोषत्वाकडे स्पष्टपणे निर्देश करत असल्याने त्याच्याविरुद्ध सुरू असलेली फौजदारी कारवाई कायम ठेवण्याचे कोणतेही कारण नसल्याचे न्यायालयाने नमूद केले आणि त्याच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेली एफआयआर रद्द करण्याचा आदेश दिला.

'भेदाभेद भ्रम अमंगळ' ते 'लव्ह जिहाद': वारी आणि कीर्तनांत 'हिंदुत्व' कसं आलं?



धर्मासारखं जगा नाहीतर दिवस वाईट येतील! आपल्या मुली लव्ह जिहादला बळी पडत आहेत. 'सकाळी मांसाहर करून दुपारी वारीत आलात तर आम्ही का स्वीकारायचं?''तुम्ही आधी हिंदू आहात मग अमुक एका जातीचे' ही वक्तव्य आहेत वेगवेगळ्या कीर्तनांमधून केली गेलेली. कीर्तनांमधून अलिकडे मांडल्या जाणाऱ्या मुद्द्यांची ही फक्त काही उदाहरणं. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' म्हणणाऱ्या वारकरी संप्रदायात गेल्या काही वर्षांमध्ये 'धर्म' हा मुद्दा प्रामुख्याने वारंवार मांडला जाताना दिसत आहे. नेमकं काय घडतंय? वारीच्या माध्यमातून हिंदूत्व आणि धार्मिक द्वेषाचा प्रसार केला जात आहे का याचा आढावा आम्ही घेतला. अल्लाह देवे अल्लाह दिलावे - अभंग आणि वाद

संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज यांची पालखी पुण्यात मुक्कामाला होती. शहरात येणाऱ्या वारकऱ्यांच्या स्वागतासाठी लावण्यात आलेल्या बोर्डवर, 'अल्लाह देवे, अल्लाह दिलावे, या अभंगाच्या ओळी लिहिण्यात आल्या होत्या. या ओळींवरून वाद झाला.

हिंदुत्ववादी संघटनांनी हा 'इस्लामी ' प्रचार असल्याचा आरोप केला. तर फक्त 'अल्लाह' असा उल्लेख आला म्हणून या ओळींवर आक्षेप का? असा सवाल पुरोगामी संघटनांकडून विचारण्यात आला. गेल्या काही वर्षांमध्ये वारीत धार्मिक द्वेष वाढताना दिसत आहे त्याचं हे एक उदाहरण.

याबाबत नेमका आक्षेप का आहे, हे सांगताना पंढरपूरचे लेखक आणि किर्तनकार रामकृष्ण वीर दावा करतात की, वारकरी संप्रदाय हा हिंदू धर्माधिष्ठित आहे.

गेल्या काही काळापासून संप्रदाय आणि संतवचनांचा विपर्यास करण्याचा प्रयत्न सुरू आहे. वारकरी सांप्रदायाला धर्म ही संकल्पना नाही, तो निधर्मी आहे हे अपप्रचार असल्याचा दावा ते करतात.

वारीतलं हिंदुत्व

बीबीसी मराठीशी बोलताना वीर म्हणाले, वारकरी संप्रदाय हिंदूधर्माधिष्ठित आहे. मात्र वारकरी सांप्रदायाची वैश्विक आणि व्यापक भूमिका अशी आहे की, उपासना करत असताना 'यारे यारे लहान थोर याती भलती नारी नर'. ज्याला उपासना करायची आहे, ज्याला रामकृष्ण हरी म्हणायचं आहे, ज्याला पंढरीच्या वाटेवरती चालायचं आहे असे लोक.

'कंठी मिरवा कृष्ण तुळसी व्रत करा एकादशी', हा छत्रपतींना उपदेश तुकोबरायांनी केलेला आहे.

म्हणजे इकडे तुम्ही कुणी या राजसत्तेत असाल किंवा कुठल्या धर्मात असाल कुणी या इथं आल्यानंतर भगवंताची उपासना करण्यासाठी कोणालाही नाकारलेलं नाहीये. मात्र विविध पंथातले विविध धर्मातले लोक वारकरी संप्रदायात आले म्हणजे वारकरी संप्रदायाचा धर्म बदलतो असं होत नाही ना.

आज कबीर मोमीन लतिफ मुसलमान पण वारकरी संप्रदायात आले.

कबीर महाराजांची भूमिका अशी आहे की मेरा पैगंबर इट पे खडा आहे. ते त्या पांडुरंगाला पैगंबर असं म्हणतात. त्यांनी पैगंबराची उपासना किंवा नमाज वारकरी संप्रदायात केले नाही. त्यांनी अभंग रचना केली.

वारीतलं हिंदुत्व

वीर पुढे सांगतात, तर मुळात वस्तुस्थिती अशी आहे. इथं प्रत्येकाला यायला परवानगी आहे. इथं आल्यानंतर जे काही संप्रदायाचे जे काही नियम आहेत, जे काही ग्रंथ आहेत ते अधिष्ठानाला धरून. पंढरीची वारी असेल, चंद्रभागेचे स्नान असेल, विधितो हारि कथा असेल या सगळ्या गोष्टींना श्रीकृष्ण भक्तीची जी काही परंपरा आहे, त्या परंपरेमध्ये ज्याला ज्याला यायचं असेल त्याच्यामध्ये रममाण व्हायचं असेल तर आम्ही बंधन कोणाला घातलेलं नाही.

मात्र, परवा पुण्यामध्ये असतील किंवा हे गेल्या पाच सहा वर्षापासून प्रकार सुरू आहेत. जसं की 'अल्लाह देवे अल्लाह दिलावे'. ज्या वेळेला साधू संतांकडे अनेक पंथातले लोक जात असतात, त्या वेळेला त्यांना तुकोबारायांनी केलेला तो उपदेश आहे. मग त्या संताला त्या पद्धतीने जर त्यांनी केलेला उपदेश असेल तर तुकोबाराय 'अल्लाह देवे अल्लाह दिलावे' म्हणतात असा त्याचा अर्थ होत नाही ना.

पण खरंच संप्रदाय ही भूमिका सांगतो का? संत तुकोबारायांची पालखी निघते तेव्हा तिचा पहिला विसावा असतो तो अनगडशाह बाबा दर्ग्यावर. वारकरी सांप्रदायात अनेक मुस्लीम कीर्तनकार होऊन गेले. सातत्याने वारी करणाऱ्या मुस्लीम धर्मीयांची संख्याही मोठी असल्याचं कीर्तनकार श्यामसुंदर महाराज सोन्नर सांगतात. मुळात धमार्ची व्याख्याच आज चुकीच्या पद्धतीने सांगितली जात असल्याचं त्यांचं म्हणणं आहे.

मराठीशी बोलताना संविधानावर कीर्तन करणारे श्यामसुंदर महाराज सोन्नर म्हणाले, ₹रामायण आणि महाभारत ही दोन्ही धर्मयुद्धं आहेत. मग ही युद्धं कोणामध्ये झाली तर ती कौरव आणि पांडवांमध्ये. मग पांडव



हे हिंदू होते तर कौरव मुसलमान, ख्रिश्चन होते का? ते त्यांचे भाऊ होते. हिंदूच होते. रामायण हे धर्मयुद्ध कोणामध्ये झालं तर रामाचे सैन्य हिंदू होतं आणि रावणाचंही सैन्य हिंदूच होतं. मग ही धर्मयुद्धं कशी? हो हे धर्मयुद्ध आहे. पण तुकाराम महाराज सांगतात तो धर्म आहे. सत्य तोच धर्म. संतांच्या मते हा सत्य आणि असत्यातला लढा आहे.

राजकीय पक्ष आणि अध्यात्मिक आघाड्या

हे वाद यापूवीर्ही होत होते. पण आता याला पार्श्वभूमी आहे ती राजकीय पक्षांच्या वारीतल्या उपस्थितीचीही. गेल्या काही वर्षांपासून विविध राजकीय पक्षांच्या अध्यात्मिक आघाड्यांची स्थापना झाली. वारी आणि उरलेला वर्षभरातला काळ या आघाड्या कीर्तनकार आणि वेगवेगळ्या फडांच्या प्रमुखांशी संपर्कात असतात. यापैकी धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे अक्षय महाराज भोसले वारीसोबत दररोज पायी जात आहेत.

दिंड्यांना काय हवं नको ते पहाणे, वारकर्यांना आवश्यक वस्तूंचं वाटप करणे हे त्यांचं काम. या आघाडीकडून रेनकोट, बूट, पिशव्या, अन्न धान्य, औषधे या सोबतच इतर गोष्टींचं वाटप केलं जातं.

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेची ही अध्यात्मिक आघाडी. दरवर्षी वारीच्या दरम्यान साधारण 25 ते 27 लाख रुपयांचा खर्च वारकऱ्यांसाठी वारी दरम्यान या आघाडीकडून केला जातो.

2019 मध्ये भाजपच्या अध्यात्मिक आघाडीचीही स्थापना झाली. आचार्य तुषार



भोसले त्याचं नेतृत्व करतात. या दोन्ही आघाड्या वारी सोबतच संपूर्ण वर्षभर कार्यरत असतात. वारकऱ्यांना काय हवं नको ते पाहणं, अडचण, अपघात झाल्यास मदत पोहोचवणं ही कामं या आघाड्यांकडून प्रामुख्याने केली जातात.

वारीतलं हिंदुत्व

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात आम्ही पोहोचलो तेव्हा धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे अक्षयमहाराज भोसले हे वेगवेगळ्या दिंड्यांमधील लोकांसोबत चालत संवाद साधत होते. अध्यात्मिक आघाडीकडून केल्या जाणाऱ्या कामाबद्दल सांगताना त्यांनी ही प्रश्न सोडवण्यासाठीची थेट व्यवस्था असल्याचं स्पष्ट केलं.

जवळपास एकशे पंधरा संप्रदायांसोबत सध्या आघाडी काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

ते म्हणाले, जसं शासन आपल्या दारी होतं. तसं सरकार हे साधुसंतांच्या सेवेकरता आहे. यात मंदिर, आश्रम, त्यांच्या जमिनी किंवा आणखी काही अडचणी असतील तर ते आपण सोडवतो. यासाठी त्यांना आपल्याकडे यावं लागत नाही तर आपली टीम त्यांच्या पर्यंत पोहोचते आणि मग त्यांचे प्रश्न थेट मंत्रालयापर्यंत नेत ते सोडवले जातात. शंभर प्रश्न असतील तर त्यातले किमान सत्तर तरी मार्गी लागतात.

या सगळ्या संप्रदाय मठ, मंदिर, या सगळ्यांमध्ये समन्वय ठेवण्याचं काम भाजपची अध्यात्मिक आघाडी करते.

साधुसंत, सांप्रदायांचे प्रमुख हे हिंदुत्वाचं काम करतात आणि हिंदुत्ववादी विचारधारा समाजात रुजवतात त्यामुळे त्यांच्याशी सातत्याने संपर्क, समन्वय असला पाहिजे या हेतूने भाजपच्या अध्यात्मिक आघाडीची स्थापना झाल्याचं आचार्य तुषार भोसले सांगतात.

2016 मध्ये या स्वतंत्र आघाडीची स्थापना झाल्याचं ते सांगतात.

वारीतलं हिंदुत्व

आघाडीच्या कामाविषयी बोलताना आचार्य तुषार भोसले म्हणाले, कीर्तनकार किंवा साधुसंत 24 तास धर्मकार्यामध्ये व्यस्त असतात. काही विरोधी विचारांचे लोक ज्यांना हिंदू धर्म आणि हिंदुत्वाविषयी पोटशूळ असणारे लोक साधुसंत, किर्तनकार आणि त्यांच्या मठमंदिरांना लक्ष्य करतात. त्यांना त्रास देण्यासाठी मोठ्या प्रमाणात त्यांना पाठबळ असतं. तसंच अनेक राजकीय विचारधारांचेही असतं.

अनेक संस्था संघटनांचेही असतं. अशावेळी त्यांना जर काही त्रास झाला की मंडळी आमच्याशी संपर्क करतात आणि तात्काळ गृहखातं असेल किंवा त्यांना ज्या विभागाकडून त्रास होत असेल त्या संबंधित मंत्र्यांना संपर्क केला जातो. आणि मला अतिशय अभिमान आहे की माननीय देवेंद्रजी फडणवीस हे प्रचंड धर्मक्षेत्राविषयी आणि हिंदुत्वविषयी आस्था असणारे मुख्यमंत्री असल्यामुळे एका तासाच्या आत सगळे प्रश्न मिटतात.

याचे परिणाम नेमके काय होत आहेत

या दोन्ही आघाड्यांच्या माध्यमातून एखाद्या गोष्टीबद्दल भूमिका घ्यायची वेळ आली तर आघाड्यांकडून या कीर्तनकारांना, महाराजांना संपर्क केला जातो. राजकीय पक्षांच्या आघाड्यांसोबतच अनेक संघटनाही वारीच्या माध्यमातून संपर्क करत आहेत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर गेल्या काही वर्षांमध्ये किर्तनातून मांडले जाणारे मुद्दे बदलताना दिसत आहेत. सांप्रदाय, हरिपाठ, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, संतांचे अभंग याभोवती फिरणारी किर्तनं आज मात्र धर्माच्या मुद्द्यावर भाष्य करताना दिसत आहेत.

अलिकडे कीर्तनांमध्ये दोन प्रवाह दिसत असल्याचं 'होय होय वारकरी' या पुस्तकाचे लेखक आणि कीर्तनकार ज्ञानेश्वर महाराज बंडगर सांगतात.

यात एक प्रवाह विनोदी कीर्तनकारांचा. ज्यांना विचारसरणीशी देणंघेणं नाही तर दुसरा राजकीय पक्षाची विचारसरणी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या मांडताना दिसतो. यात 'कोडवर्ड' वापरले जात असल्याचं ते सांगतात.

संतांनी 'धर्म' रक्षणाचं काम केलं आणि आमचा अमुक अमुक पक्ष हा धर्मरक्षणाचं काम करतोय. त्याच्यामुळे या पक्षाला मतदान करणं म्हणजे वारकरी संप्रदायाच्या विचाराला अनुसरुन आहे. आणि दुसरा एक प्रवाह असं म्हणतोय की संतांनी समता सांगितली, बंधुता सांगितली आणि ती संविधानात आलेली आहे आणि संविधान वाचवणारा आमचा पक्ष आहे. म्हणून आमच्या पक्षाला मतदान केलं तर ते वारकरी संप्रदायाच्या तत्वाला अनुसरून आहे अशी मांडणी



मी अख्ख कीर्तनच धर्मावर करतो. किंबहुना 'तुमचे केले धर्म कीर्तन सिद्धी नेले हे तर माझे उरले पाईक' माउली म्हणतात हे धर्म कीर्तनच आहे.

गळ्यामध्ये तुळशीची माळ घाला, मांसाहार करू नका, पंढरपूरची वारी करा, नामस्मरण करा. खोटं बोलू नका, आई वडीलांची सेवा करा, कुणाला फसवू नका, सगळ्यांशी समतेने प्रेमाने वागा, हे सांगणं म्हणजे धर्म प्रसार नाही का? धर्म प्रसार म्हणजे अमुक एका धमार्चाच द्वेष केला पाहिजे असं नाही ना. धमार्चा प्रसार म्हणजे वारकरी संप्रदायातल्या संतांनी जे अभंग सांगितलेले आहेत त्या अभंगाचा प्रसार करणं.

वारीतलं हिंदुत्व

पण धमार्ची ही व्याख्या उजव्या विचारसरणीच्या लोकांना मान्य होत नाही. धमार्चं रक्षण करणं हेच सांप्रदायाचं पहिलं काम असल्याचं ते सांगतात.

बीबीसी मराठीशी बोलताना प्रल्हाद महाराज बडवेंचे वंशज आशुतोष बडवे म्हणाले, त्या काळातल्या व्यवस्थेप्रमाणे भगवंताने अधमार्चा नाश करण्यासाठी अधर्मी लोकांना संपवलं आहे. पण आता अधर्मी लोक धमार्चं नाव घेऊन वेगळ्या विषयाने बोलतात. प्रत्यक्ष त्या अधमार्चा विचार करतात तर त्यांचं खंडण करणं म्हणजे तुकोंबारायांच्या उक्तीप्रमाणे धमार्चे पालन करणे.

पाखंड खंडण हे केवळ शब्दाने केलं जातं असं नाही .तुकाराम महाराजांच्या काळात ते हाती शस्त्र घेऊनही कधी करावं लागत होतं. आता हाती शस्त्र घेण्याची भाषा नाही गरज. धर्माच्या रक्षणासाठी त्या अथार्ने जर बोलला गेला तर त्यात काही चूक आहे असं मला नाही वाटत.

भक्ती आणि शक्तीचा वाद

हीच शस्त्र -भक्ती आणि शक्तीच्या मिलाफाची आवश्यक्ता असल्याचं सांगत गेल्या काही वर्षांपासून शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी देखील वारीत उपस्थित राहत आहेत.

दरवर्षी वारीत शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे प्रमुख संभाजी भिडे यांचं मार्गदर्शन झाल्यावर हे शिवाजीनगर परिसरात थांबतात. गेली अनेक वर्ष ते संत तुकाराम महाराजांच्या पालखी रथाचे सारथ्य देखील करतात. याच भिडेंनी काही वर्षांपूर्वी संतांपेक्षा मनु श्रेष्ठ असल्याचं वक्तव्य केलं होतं. असं वक्तव्य करणारे ते पहिले व्यक्ती नाहीत. यात अलिकडे काही वर्ष महिलाही दिसत आहेत.

वारीतलं हिंदुत्व

हे या दोन गोष्टी काही एकमेकांच्या विरुद्ध नाहीयेत. या पूरक आहेत. शिवाजी महाराज हे धारकरी होते. पण तुकाराम महाराज हे वारकरी होते आणि शिवाजी महाराजांच्या कामाला तुकाराम महाराजांचा आशीर्वादच होता.

मनु बद्दलच्या वक्तव्याच्या अनुषंगाने मोने पुढे म्हणाले, ₹गुरुजींच्या म्हणण्याचा अर्थ असा होता की, मनु हा राजा होता. मनु क्षत्रिय होता. ज्ञानोबा-तुकोबा हे संत आहे. संत विचारांना क्षात्रतेजाची जोड असली पाहिजे आणि तो विचार म्हणून ते म्हणले की केवळ संत परंपरा असून उपयोग नाही. त्यामध्ये मग अशावेळी या संतांचं रक्षण करण्यासाठी कोणतरी एक क्षात्रतेज घेऊन उभा राहिला पाहिजे ते विचार मनुने दिलेला आहे. म्हणून ते म्हणलेले आहेत. यामध्ये ज्ञानोबा तुकोबा यांचा अपमान करण्याचा कुठल्याही उद्देशाने ते बोललेले नाहीत. शिवाजी महाराजांवर बोलत असताना पदोपदी त्यांच्या तोंडांमध्ये तुकाराम महाराजांच्या अभंगांची दाखले असतात हेही आपण बघितलं असेल.

वारीतलं हिंदुत्व

या प्रकरणात बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न होत असल्याचं स्पष्ट करत सोन्नर महाराज म्हणतात, ₹माज्या मते यामागे नक्कीच राजकारण आहे. काही लोक आपली राजकीय भूमिका बळकट करण्यासाठी काही वारकरी मंडळींना जवळ करून असा विचार पेरण्याचा प्रयत्न करत असावेत. मात्र खऱ्या वारकऱ्यांनी याबाबत सतर्क राहायला हवं.

वारकरी संप्रदायाचा विचार हा कधीच एका धमार्पुरता मर्यादित राहिलेला नाही. मुस्लीम, ख्रिश्चन आणि हिंदू सर्वांनीच तो लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतरही आपल्या वर्तमानपत्राच्या मास्टहेडवर तुकाराम महाराज आणि ज्ञानेश्वर महाराज यांच्या ओव्या छापल्या होत्या. यावरूनच हा विचार सर्वसमावेशक असल्याचं स्पष्ट होतं.

म्हणून वारकरी संप्रदायाला कोणत्याही एका धर्मात बंदिस्त करता कामा नये. हिंदू धमार्तील काही लोकांचा द्वेष करणे मला मान्य नाही, आणि वारकरी संप्रदाय हा फक्त हिंदूंचाच आहे असंही मी म्हणणार नाही. हा सर्वांचा आहे. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन सर्वांना सोबत घेऊन चालणारा.

त्यामुळे जो कोणी कोणत्याही धमार्चा द्वेष करतो, तो वारकरी असू शकत नाही. हिंदुत्वाचा द्वेष करणारे असोत, मुस्लिमांचा किंवा ख्रिश्चनांचा द्वेष करणारे असोत, अशा



केली जात आहे.

वारीतलं हिंदुत्व

अनेकदा कीर्तनाच्या वेळी शेवटी धर्मावर दहा मिनिटं धर्मावर बोला असं सांगितलं जातं, मात्र इथे धमार्ची व्याख्या करण्यात फरक असल्याचंही ते स्पष्ट करतात.

बंडगर म्हणाले, ₹मुळामध्ये काही वेळेला आम्हाला पण कितेनाच्या ठिकाणी सांगितलं जातं की तुम्ही कीर्तनामध्ये शेवटी थोडं धर्मावर बोला. मी म्हटलं शेवटी नाही.

सहिष्णुतेचा संदेश देणाऱ्या वारीत धारकरी म्हणून का सहभागी होता असं विचारल्यावर शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे प्रवक्ते पराशर मोने यांनी दावा केला की संतांच्या काळातही भक्ती शक्तीचा मिलाफ होता.

ते म्हणाले, जे आहोत तेच म्हणून आम्ही येणार ना? आम्ही धारकरी आहोत अर्थात आमच्यामध्ये वारकरीपण आहे. पण धारकरी परंपरा आणि वारकरी परंपरा ही दोन्ही महाराष्ट्राची वैशिष्ट्य आहे आणि प्रवृत्तीला वारकरी संप्रदायात स्थान नाही. कारण खरे वारकरी कधीही जाती-धर्माच्या आधारावर भेदभाव करत नाहीत.

'भेदाभेद अमंगळ' म्हणत फक्त 'माऊली' ही ओळख जपत वारकरी संप्रदाय भेदांच्या भिंती तोडत राहिला आहे. सनातनी विरुद्ध पुरोगामी हा वादही संप्रदायासाठी नवा नाही. पण काकड आरतीला म्हणला जाणारा संत तुकोबारायांचा 'पवित्र ते कूळ' अभंग समतेचा आणि सहिष्णूतेचा पाया सांगत राहतो.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार,०४ ऑगस्ट २०२६ ते १० ऑगस्ट २०२६

संपादकीय

पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण नको!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

दिल्लीमध्ये जंतर-मंतर येथे ह्यकॉक्रोच जनता पार्टीह्णच्या (सीजेपी) वतीने ह्यनीटह्ण पेपरफुटीप्रकरणी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाचा एक भाग म्हणून सीजेपीच्या वतीने संसद भवनावर मोर्चा काढण्यात आला आणि तिथे पोलिसांनी त्यांच्यावर लाठीमार केला, म्हणून सर्वत्र पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जात आहे. पण पोलिसांची बाजू कोणीच समजून घेत नाही.स्वतःला विद्यार्थी म्हणवून घेणारे नेमके कोण आहेत, ते माहीत नाही. स्वतःला विद्यार्थ्यांचे नेते म्हणवून घेणारे कोणत्या परीक्षेला बसले होते आणि त्या परीक्षांमध्ये काय घोटाळा झाला होता, याचा कुठेही उल्लेख नाही. स्वतःला नेते म्हणवणाऱ्यांपैकी अभिजित दिपके नावाचा कोणीतरी अमेरिकेतून येतो आणि मला आंदोलन करायचे म्हणतो. त्याला दिल्ली पोलिसांनी लगेच जंतर-मंतरवर आंदोलन करण्याची परवानगी दिली. म्हणजे त्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, असेही नाही. हे सर्व युवक तिथे आंदोलनाला बसले आणि त्यांनी एकच मागणी लावून धरली आणि ती म्हणजे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. शिक्षणव्यवस्थेत नेमक्या काय सुधारणा हव्या आहेत, शासनाकडून यासंदर्भात त्यांच्या काय अपेक्षा आहेत, याबद्दल त्यांच्याकडून लेखी मुद्दे आलेले दिसले नाहीत. दर म्याना पेपरफुटीप्रकरणी दोषी आढळलेल्या लोकांवर सरकारने कडक कारवाई केली. ती सर्व मंडळी आज तुरुंगात आहेत. पेपरफुटीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर ह्यनीटह्ण परीक्षा तातडीने रद्द करण्यात आली आणि त्यातील त्रुटी दूर करून पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने ती पुन्हा घेण्यात आली. २२ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली, त्यापैकी ११ लाख विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळाला. म्हणजे या विद्यार्थ्यांची तशी तक्रार नाही. त्यांची एवढीच अपेक्षा होती, की आमची परीक्षा व्यवस्थित व्हावी आणि चांगले गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना अपेक्षित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा. सरकारने विद्यार्थ्यांची ही अपेक्षा आपणहून पूर्ण केली. याशिवाय त्यांच्या काही मागण्या असतील तर त्या त्यांनी सरकारला लेखी स्वरूपात द्यायला हव्यात. त्यावर सरकारने विचार करून त्यांची पूर्तता केली असती. पण असे काही न करता त्यांनी २० जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढणार असल्याचे जाहीर करून टाकले. त्याच दिवशी संसदेचे अधिवेशन सुरू होणार होते. भारतीय संसद हे अतिसंवेदनशील ठिकाण असल्यामुळे आणि तिथे कायदा आणि सुव्यवस्था राखणे, हे पोलिसांचे कर्तव्य असल्यामुळे भारतीय न्यायसंहितेच्या कलम ह्य१६३ बह्ण आणि पूर्वीच्या भारतीय दंड संहितेच्या ह्य१४४ह्ण नुसार या परिसरात पाच किंवा अधिक लोकांना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली. अर्थात संसदेवर मोर्चा काढायचा असेल तरी पोलीस परवानगी देतात, पण त्यासाठी मोर्चा काढणाऱ्यांना आपण कोण आहोत, मोर्चा काढण्याचे कारण काय, मोर्चामध्ये किती लोकांचा सहभाग असणार आहे, जमाव तिथे काय करणार आहे, हे स्पष्ट करावे लागते. सीजेपीने अशी कोणतीही परवानगी घेतली नाही. २० जुलै राजी तिथे देशातल्या अनेक भागांमधून युवक येण्यास सुरुवात झाली. यात विद्यार्थी किती होते, विविध राजकीय पक्षांचे भाडोत्री आंदोलक किती होते, गुंड होते की बेकायदेशीर कामे करणारे होते, याची काहीच कल्पना नव्हती. ही मंडळी आपणहून आलेली नव्हती, तर त्यांना कोणीतरी आणलेले होते. त्यांना आणणाऱ्यांना स्वतःचे चेहरे प्रकाशात येऊ द्यायचे नव्हते. त्यांनी या मुलांना भडकावून धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करा, असे सांगितले होते. मोर्चा निघताना आम्ही पुष्पगुच्छ घेऊन निघालो आहोत असे दाखवण्यात आले. पण हा केवळ देखावा होता. मागे असलेल्या युवकांसमोर कोणतेही नेतृत्व नव्हते, कोण काय सांगत आहे, याकडे त्यांचे लक्ष नव्हते. संसदेवर काही वेळा हल्ले झाले आहेत, हे आपल्याला माहीत आहे. लोकशाहीच्या दृष्टीने संसद ही अत्यंत महत्त्वाची जागा आहे. संसदेवर मोर्चा आल्यानंतर मोर्चेकऱ्यांनी ह्यबॅरिकेड्सह्णच्या अलीकडे थांबावे आणि आपल्या दोन-चार प्रतिनिधींना सरकारशी चर्चा करण्यासाठी पाठवावे, हा दंडक आहे. या मोर्चेकऱ्यांनी मात्र ह्यबॅरिकेड्सह्ण उधळून लावून किंवा त्यांच्यावर चढून संसदेत घुसण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे संसदेमध्ये शिरू पाहणाऱ्या लोकांना अडवण्याची पोलिसांची जबाबदारी असते. हे मोर्चेकरी नुसता शिरण्याचा प्रयत्न करून थांबले नाहीत, तर त्यांनी तिथे जोरदार दगडफेक सुरू केली. त्याचबरोबर या युवकांनी तिथे बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलिसांवरही हल्ले केले आणि काही पोलिसांना बेदम मारहाण करण्यात आली. अगदी पोलीस शिपायापासून विशेष पोलीस आयुक्त दर्जाच्या आयपीएस अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांना मारहाण केल्याचे किमान ७२ अधिकृत व्हिडीओज उपलब्ध आहेत. या जमावाने तिथे असलेल्या पेट्रोल पंपावर हल्ला केला, महिला पोलिसांवर हल्ला केला, पत्रकारांवर हल्ला केला. म्हणजे यातून त्यांनी कोणालाच सोडले नाही. हे कमी की काय म्हणून तिथे उभ्या असलेल्या पोलिसांच्या आणि खासगी वाहनांची तोडफोडही करण्यात आली. गरीब रिक्षावाल्यांनाही सोडले नाही. हे सगळे होत असताना दिपकेसहित सीजेपीचे नेते युवकांना मारहाणीसाठी आणि मालमत्तेचे नुकसान करण्यासाठी प्रोत्साहन देताना दिसत होते. म्हणजे स्वतःची जबाबदारी काय, याची कल्पना नसलेले लोक पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत आहेत. मोर्चामध्ये आंदोलक जाळपोळ करत असतील, कोणाला मारहाण करत असतील, सरकारी आणि खासगी मालमत्तेचे नुकसान करत असतील तर पोलिसांनी ते शांतपणे पाहत राहणे अपेक्षित नाही. त्यांना कायदा आणि सुव्यवस्थेच्या रक्षणासाठी तैनात करण्यात आलेले असते. हिंसक मार्गाने जाणाऱ्या आंदोलकांवर कारवाई करण्याचे अधिकार त्यांना कायद्याने देण्यात आले आहेत. या जमावाला पोलिसांनी प्रथम शांतता राखण्याचे आवाहन केले, त्यानंतर त्यांना चेतावणी देण्यात आली आणि त्यानंतर कमरेच्या खाली सौम्य लाठीचार्ज करण्यात आला. तरी जमाव नियंत्रणात येत नाही म्हटल्यावर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. नळकांड्या फुटल्यावर त्याचे धातूचे काही तुकडे जमावातल्या काहींना लागू शकतात. त्यांना पॅलेट्स म्हणण्यात काही अर्थ नाही. या घटनेनंतर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एका व्यक्तीला सर्वांसमोर आणले आणि त्याला झालेल्या जखमा पॅलेट्समुळेच झाल्या असल्याचा दावा केला. पण पोलिसांनी पॅलेट गन्सचा वापर केला असता, तर एकाच व्यक्तीला कशा पॅलेट्स लागतील? तिथे जमा झालेल्या शेकडो लाकांना त्या लागल्या असत्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या मोर्चासाठी तैनात असलेल्या पोलिसांपैकी १५० हून अधिक पोलीस अधिकारी जखमी झाले. ते सगळे रुग्णालयात दाखल आहेत. म्हणजे ते काही हल्ला झाल्याचे खोटे सांगत नाहीत. याउलट जमावापैकी कोणालाही रुग्णालयात दाखल करण्याची गरज भासली नाही. पोलिसांच्या लाठीचार्जमध्ये एका मुलीचा मृत्यू झाल्याची आवई उठवली गेली, तीही खोटी ठरली. या सगळ्या घटनाक्रमाचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये चित्रण झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी बळाचा वापर केला म्हणून त्यांच्यावर खापर फोडणे योग्य नाही. आंदोलकांची संसदेमध्ये चर्चा करायची तयारी नाही. संसद ठरावीक नियमांप्रमाणे चालते. तिथे मुद्द्यांवर चर्चा केली जाते, प्रक्रियेला वेळ लागतो, पण आंदोलकांना सगळे आत्ताच्या आत्ता हवे आहे. योगेंद्र यादव नावाचे महाशय स्वतःला पत्रकार किंवा नेता म्हणवतात. ते म्हणतात, आता निर्णय संसदेत नाही, तर रस्त्यावर होतील. म्हणजे झुंडशाहीचेच राजकारण चालणार का? झुंडशाहीला हे तथाकथित नेतेच प्रोत्साहन देत आहेत. आज दिल्लीमध्ये दंगल झाली, उद्या कर्नाटक, केरळ किंवा इतर बिगर भाजपाशासित राज्यांमध्येही हे होऊ शकेल. सगळीकडे आपल्याला दंगलीच करायच्या आहेत का, हा मुद्दा आहे. मुंबईमध्येही निदर्शने झाली. तिथे पोलिसांनी काही लोकांना थोड्या कालावधीसाठी अटक करून सोडून दिले. तर इथले नेते म्हणतात, की तुम्ही कोण आम्हाला हात लावणारे? सर्वोच्च न्यायालयाने वारंवार स्पष्ट केले आहे, की रस्ता ही निदर्शने करण्याची जागा नाही. रस्त्यावर वृद्ध लोक असतात, रुग्णवाहिका येत-जात असतात, सामान्य नागरिक कामासाठी बाहेर पडलेले असतात. रस्त्याचा वापर करण्याचा पहिला हक्क त्यांचा आहे. प्रत्येक ठिकाणी काही मैदाने आहेत. अशा ठिकाणी परवानगी घेऊन शांततेच्या मार्गाने आंदोलने केल्यास ही समस्याच उद्भवणार नाही. झुंडशाहीला राजकीय पक्षांनी प्रोत्साहन द्यायचे की नाही, हा मुद्दा आहे. या झुंडशाहीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वसामान्यांच्या संमतीनेच शासनाने पोलिसांना कारवाईचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे कोणीही उठून पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करू नये.

पंतप्रधानांचे धैर्य का ढासळले!

दिल्लीच्या जंतरमंतरवर पेटलेले विद्यार्थी आंदोलन हे देशाच्या ढासळलेल्या शिक्षण व्यवस्थेविरुद्ध उभे राहिलेले तरुणाईचे बंड आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न रस्त्यावर धगधगत असताना देशाचे सर्वोच्च नेतृत्व तब्बल २६ दिवस मौन बाळगते आणि परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागल्यानंतर समाजमाध्यमावरून काही ओळींचे आश्वासन देऊन जबाबदारी पूर्णत्वाचा आभास निर्माण करते. खरे तर ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ट्विट (एक्स) उशिरा आले; पण त्यात अपेक्षित संवेदनशीलता वा आत्मपरीक्षण नव्हते. उत्तरदायित्वही नव्हते. त्यात वाढत्या जनक्षोभाची धार बोथट करण्याचा राजकीय प्रयत्न दिसून आला. देशातील तरुण आज प्रश्नपत्रिका फुटीविरोधात, आपल्या कष्टाच्या सन्मानासाठी लढत आहेत. वर्षानुवर्षे अभ्यास करून, आई-वडिलांचे कष्टाचे पैसे खर्च करून, स्वप्नांची उभारणी करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना आज स्वतःच्या गुणवत्तेवर नाही, तर भ्रष्ट व्यवस्थेवर मात करावी लागत आहे. ही कोणत्याही राष्ट्रासाठी लाजिरवाणी बाब आहे. जेथे गुणवत्तेपेक्षा पैशाची किंमत वाढते, तेथे शिक्षण मरते आणि त्या शिक्षणाबरोबर राष्ट्राचे भविष्यही अंधारात ढकलले जाते.

या आंदोलनाची ताकद म्हणजे, ते कोणत्याही राजकीय पक्षाच्या आदेशाने उभे राहिलेले नाही. ही चळवळ जन्माला आली ती तरुणांच्या मनात साचलेल्या संतापातून. समाजमाध्यमांवरील असंतोष जेव्हा रस्त्यावर उतरतो, तेव्हा तो केवळ आंदोलन राहत नाही; तो जनमत बनतो. सरकारने हा आवाज सुरुवातीलाच समजून घेतला असता, तर आज परिस्थिती एवढी चिघळली नसती. पण संवादाऐवजी दमनाचा मार्ग स्वीकारला गेला. विद्यार्थ्यांवर लाठीमार झाला, अश्रूधुराचा मारा झाला, आंदोलन मोडून काढण्याचे प्रयत्न झाले. सत्तेला बहुधा वाटले असावे की, पावसाबरोबर आंदोलनही वाहून जाईल. पण झाले उलटेच. पावसाने तरुणांच्या निर्धाराला अधिक धार दिली. इतिहासाचा एक साधा नियम आहे, जनतेचा आवाज जितका दाबण्याचा प्रयत्न कराल, तितका तो अधिक बुलंद होतो. जंतरमंतरवर तेच घडले. विद्यार्थ्यांच्या मागण्या फार मोठ्या नव्हत्या. परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचार थांबवा,



दोषींना शिक्षा करा आणि नैतिक जबाबदारी स्वीकारा, एवढेच ते म्हणत होते. पण सत्तेला प्रत्येक मागणीत कटकारस्थान दिसू लागले तर त्याला विद्यार्थी तरी काय करणार?

पंतप्रधानांनी आपल्या संदेशात दोषींना सोडले जाणार नाही, जलदगती न्यायालये स्थापन केली जातील, असे आश्वासन दिले. हेच वाक्य देशाने यापूर्वी वारंवार ऐकले आहे. प्रत्येक पेपरफुटीनंतर तीच भाषा, तेच आश्वासन आणि काही दिवसांनी पुन्हा तोच घोटाळा. मग चूक नेमकी कुठे आहे? कायद्यात, की कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांत? प्रश्नपत्रिका फुटीची साखळी वर्षानुवर्षे जिवंत राहते, याचा अर्थ केवळ काही दलाल दोषी नाहीत; व्यवस्थेत कुठेतरी खोलवर कुज सुरू आहे. त्या कुजलेल्या मुळांवर प्रहार करण्याऐवजी सरकार फांद्या छाटण्याचे नाटक करत आहे. जलदगती न्यायालये हा उपायाचा एक भाग असू शकतो; पण तो उपायाचा केंद्रबिंदू नाही.

विद्यार्थ्यांचे गेलेले वर्ष कोणते न्यायालय परत देणार? आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या तरुणाचा आत्मविश्वास कोणता न्यायाधीश परत आणणार? पालकांनी विकलेली शेती, गहाण ठेवलेले दागिने, घेतलेले कर्ज आणि त्यातून उभारलेली स्वप्ने कोण भरून काढणार? या प्रश्नांची उत्तरे केवळ न्यायालयात नसतात; ती राजकीय इच्छाशक्तीत असतात. लोकशाहीत संवादाला पर्याय नसतो. पंतप्रधानांनी आंदोलनाच्या पहिल्याच आठवड्यात विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींना बोलावले असते, तर आज परिस्थिती वेगळी असती. पण सध्याच्या सत्तेतील नेतृत्वाला संवादापेक्षा संदेश देणे अधिक आवडते. रेडिओवरून संवाद, समाजमाध्यमांवरून संदेश आणि सभांमधून भाषणे हे सर्व ठीक आहे; पण न्यायासाठी रस्त्यावर उभ्या असलेल्या नागरिकांशी प्रत्यक्ष बोलण्याचे धैर्य त्याहून मोठे असते. ते धैर्य या संपूर्ण प्रकरणात दिसले नाही.

एवढ्या गंभीर विषयाबाबत संसद सुरू असतानाही भूमिका समाजमाध्यमावरून मांडली गेली. संसद हे लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. तिथे उत्तरदायित्व असते, प्रतिप्रश्न असतात आणि जबाबदारी स्वीकारावी लागते. समाजमाध्यमांवर मात्र एकतर्फी संदेश दिला जातो, हे लोकांना समजणार नाही का? ह्यविकसित भारताह्णची घोषणा करणाऱ्या सरकारने एकदा स्वतःलाच विचारावे ज्या देशातील तरुणांना स्पर्धा परीक्षांवर विश्वास उरलेला नाही, त्या देशाचा विकास नेमका कोणत्या पायावर उभा राहणार? रोजगार कमी, स्पर्धा प्रचंड आणि त्यातही परीक्षा भ्रष्टाचाराच्या विळख्यात. अशा परिस्थितीत तरुणांमध्ये निर्माण झालेली चीड ही व्यवस्थेविरोधी आहे. त्या व्यवस्थेचे नेतृत्व मात्र सरकारकडेच आहे.

आता वेळ घोषणांची नाही; निर्णयांची आहे. परीक्षा घेणाऱ्या संस्थांची संपूर्ण पुनर्रचना झाली पाहिजे. प्रश्नपत्रिकांच्या सुरक्षेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर झाला पाहिजे. राजकीय हस्तक्षेपापासून परीक्षा यंत्रणा मुक्त झाली पाहिजे. घोटाळ्यांमागील सूत्रधार कोणत्याही पक्षाचा, कोणत्याही पदाचा असो, त्याला कायद्यापुढे उभे केले गेले पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सरकारने आंदोलक विद्यार्थ्यांशी तातडीने प्रत्यक्ष संवाद साधला पाहिजे. जंतरमंतरवरील आंदोलनाने सत्तेला आरसा दाखवला आहे. त्या आरशात सरकारला स्वतःचा चेहरा पाहण्याचे धैर्य असेल, तर अजूनही परिस्थिती सुधारू शकते.

शिक्षण व्यवस्थेला जडलेला पेपरफुटीचा कॅन्सर

विद्यार्थ्यांच्या कष्ट, गुणवत्ता आणि प्रामाणिकपणाचे संरक्षण करणे हीच खरी राष्ट्रनिर्मिती आहे, अन्यथा प्रत्येक नवीन पेपरफुटी ही एका परीक्षेची बातमी नसून, शिक्षण व्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासाच्या शवपेटीवर ठोकला जाणारा आणखी एक खिळा ठरेल.

पेपर फुटतो, परीक्षा रद्द होते, चौकशी जाहीर होते, काही अटक होतात आणि काही दिवसांनी पुन्हा दुसऱ्या परीक्षेचा पेपर फुटतो. दुर्दैवाने आज भारतातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षांचे हेच वास्तव आहे. ही आता एखाद्या परीक्षेतील त्रुटी राहिलेली नाही, तर शिक्षण व्यवस्थेच्या शरीरात पसरलेला कॅन्सर बनली आहे.

व्यापम २.० : एकेकाळी मध्य प्रदेशातील व्यापम घोटाळा हा देशातील सर्वात मोठा परीक्षा घोटाळा मानला जात होता. पण गेल्या काही वर्षांतील घडामोडी पाहता महाराष्ट्रातही व्यापम २.० सुरू आहे का? असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही. स्पर्धा परीक्षा, भरती प्रक्रिया आणि शिक्षण व्यवस्था संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. NEET, TET, MHT-CET, MPSC, शिक्षक भरती, आरोग्य भरती, म्हाडा भरती, तलाठी भरती अशा अनेक परीक्षांभोवती निर्माण झालेले वाद हा केवळ योगायोग नाही. ही संपूर्ण व्यवस्था कुठेतरी गंभीर आजाराने ग्रासली असल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

दुष्टचक्र : देशातील लाखो विद्यार्थी दिवसाचे १२ ते १४ तास अभ्यास करतात. पालक कर्ज काढून मुलांना कोचिंगला पाठवतात. शेतकरी व कामगार आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी आयुष्याची कमाई खर्च करतात. कर्ज काढतात. मात्र पेपर फुटतात, परीक्षा रद्द होते आणि काही परीक्षांच्या गुणांकनावरच प्रश्नचिन्ह उपस्थित होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे काय? असा प्रश्न साहजिकपणे उपस्थित होतो. पण विद्यार्थी आणि पालकांना सतत भेडसावणाऱ्या या समस्येकडे सरकार मात्र ढुंकूनही पाहात नाही.

NEET पेपरफुटीने संपूर्ण देश हादरला. २६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे भविष्य एका क्षणात अधांतरी लटकले. परीक्षा रद्द झाली. त्यामुळे देशभरात २५ हून अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. त्यानंतर देशभरात अभूतपूर्व असे विद्यार्थी आंदोलन उभे राहिले. दिल्लीच्या



जंतरमंतरपासून मुंबईच्या शिवाजी पार्कपर्यंत हजारो-लाखो विद्यार्थी पेपरफुटीविरोधात रस्त्यावर उतरले. दिल्लीसह अनेक शहरांमध्ये विद्यार्थ्यांनी शांततापूर्ण आंदोलन केले. दिल्ली पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अमानुष लाठीमार केला. विद्यार्थिनींना पोलीस जनावराप्रमाणे मारत असल्याचे व्हिडीओ पाहून अख्खा देश गहिवरला. पोलिसी अत्याचाराचा कळस म्हणजे लहान पोरांवर इलेक्ट्रिक बॅटनचा वापर करून शॉक दिला, पॅलेट गन चालवल्या. हजारो विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले, पण त्यांनी लढा चालूच ठेवला. कारण हा प्रश्न केवळ एका परीक्षेचा नव्हता; तो त्यांच्या भविष्याचा होता.

शिक्षणाचा घोटाळा : महाराष्ट्रातील ळएळ पेपरफुटी घोटाळ्याने तर शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराचे भयावह चित्र समोर आणले. महाराष्ट्रामध्ये होत असलेल्या परीक्षेचा पेपर बिहारच्या पेपर माफियांनी फोडला. शिक्षण मंत्र्यांना पेपर फुटल्याची माहितीही बराच काळ नव्हती. पेपरची राज्यभरात विक्री सुरू असताना कोणालाच काही माहिती नव्हती यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. MHT-CET च्या गुणांकनाबाबतही अनेक विद्यार्थी आणि पालकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. गुणांकनातील विसंगती आणि प्रवेश प्रक्रियेतील अनिश्चितता यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. काही प्रकरणांमध्ये विशिष्ट उमेदवारांच्या निकालांबाबत सामाजिक माध्यमांवर प्रश्न उपस्थित झाले. अशा प्रत्येक प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे, कारण विश्वास हीच परीक्षा व्यवस्थेची सर्वात मोठी ताकद असते.

वादग्रस्त MPSC : अलीकडे टढरउ च्या औषध निरीक्षक भरती परीक्षेबाबतही पेपरफुटीचे आरोप झाले. एका कोचिंग क्लासने दिलेल्या मॉडेल प्रश्नपत्रिकेतील ९० प्रश्न जसेच्या तसे टढरउ ने घेतलेल्या परीक्षेत आले. उत्तराच्या पर्यायांचा क्रमही न बदलता. यावरून पेपर फुटल्याचे स्पष्ट होऊनही सुरुवातीला हे नाकारण्यात आले. आरोप करणकऱ्यांवर कारवाई करण्याची भाषा वापरण्यात आली. मात्र नंतर उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे चौकशीची तयारी दाखवण्यात आली. हा प्रकार नवीन नाही. आधी नकार, मग मर्यादित चौकशी आणि नंतर विषय थंड करण्याचा प्रयत्न हा क्रम विद्यार्थ्यांना आता पाठ झाला आहे. विद्यार्थ्यांनी आवाज उठवला नसता, तर अनेक प्रकरणे कदाचित कधीच बाहेर आली नसती.

बनावट पदव्या : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बनावट पदवी प्रमाणपत्रांचे रॅकेट उघड झाले. थेट डिग्रीच विकत मिळत असल्याने परीक्षेची गरज राहिलेली नाही. बनावट शालार्थ आदेशांच्या आधारे शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या नोंदी करून शासनाची कोट्यवधी रुपयांची कथित फसवणूक झाल्याचे प्रकरण उघड झाले. शिक्षण क्षेत्रात इतक्या वेगवेगळ्या प्रकारचे घोटाळे एकाच काळात समोर येत असतील, तर ही व्यवस्थेतील खोलवर रुजलेल्या भ्रष्टाचाराची लक्षणे आहेत.

मानसिक त्रास : अभ्यास, मेहनतीपेक्षा पैसा आणि वशिला अधिक प्रभावी ठरत आहे. लाखो रुपये मोजून प्रश्नपत्रिका, प्रवेश किंवा नोकरी मिळू शकते, अशी भावना जर तरुणांमध्ये निर्माण झाली, तर त्याहून मोठे व्यवस्थेचे अपयश असू शकत नाही. गरीब, शेतकरी, कामगार, दलित, आदिवासी आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थी प्रामाणिकपणे अभ्यास करतात. त्यांच्याकडे पैसा नसतो; त्यांच्याकडे फक्त गुणवत्ता असते. जर गुणवत्तेलाच संधी मिळाली नाही, तर सामाजिक न्यायाची संकल्पनाच अर्थहीन ठरेल. परीक्षा, निकाल आणि भरती प्रक्रियेतील गोंधळामुळे विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक ताण निर्माण होतो आणि ते टोकाचे पाऊल उचलतात.

परीक्षा लोकपाल : गेल्या दशकात परीक्षा व्यवस्थेतील विश्वासार्हता सातत्याने कमी झाली आहे. परीक्षा आणि भरती प्रक्रियेत विद्यार्थी युवक आणि सर्वसामान्यांचा विश्वास पुन्हा स्थापित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. यासाठी पुन्हा समित्या नेमून वेळ घालवण्यापेक्षा तत्काळ कार्यवाही सुरू केली पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. प्रश्नपत्रिकेची निर्मिती, छपाई, वाहतूक आणि वितरण या प्रत्येक टप्प्यावर तंत्रज्ञानाचा वापर करून जबाबदारी निश्चित केली पाहिजे. पेपरफुटीच्या प्रकरणांचा तपास स्वतंत्र विशेष तपास पथकाकडे देऊन न्यायिक निरीक्षणाखाली कालबद्ध पद्धतीने पूर्ण केला पाहिजे. दोषींवर केवळ गुन्हे दाखल करून चालणार नाही. त्यांना कठोर शिक्षा होईल यासाठी पाठपुरावा केला पाहिजे. भरती प्रक्रिया निश्चित वेळापत्रकानुसार पूर्ण करण्याची कायदेशीर सक्ती झाली पाहिजे. परीक्षांशी संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी स्वतंत्र परीक्षा लोकपाल स्थापन करण्याची आवश्यकता आहे.

शिक्षण व्यवस्था ही कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा कणा असते. त्या व्यवस्थेत पेपरफुटी, गुणांमध्ये फेरफार, अपात्र उमेदवारांना पात्र ठरविणे आणि संघटित गैरव्यवहार घडत असतील, तर ते केवळ परीक्षेचे अपयश नसून राष्ट्राच्या भविष्यासाठीचा गंभीर धोका आहे. अलीकडील तपासांत डिजिटल पुरावे, आर्थिक व्यवहार आणि संगनमताच्या आधारे हजारो कोटींचे पेपरफुटी रॅकेट उघड झाले आहे. त्यामुळे आता केवळ आश्वासने नव्हे, तर निष्पक्ष आणि कालबद्ध चौकशी, दोषींना कठोर शिक्षा, अत्याधुनिक तांत्रिक सुरक्षा, संपूर्ण पारदर्शकता आणि राजकीय हस्तक्षेपाला पूर्णविराम देणारी ठोस व्यवस्था उभी करणे अपरिहार्य आहे. विद्यार्थ्यांच्या कष्ट, गुणवत्ता आणि प्रामाणिकपणाचे संरक्षण करणे हीच खरी राष्ट्रनिर्मिती आहे. अन्यथा प्रत्येक नवीन पेपरफुटी ही एका परीक्षेची बातमी नसून, शिक्षण व्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासाच्या शवपेटीवर ठोकला जाणारा आणखी एक खिळा ठरेल.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,०४ ऑगस्ट २०२६ ते १० ऑगस्ट २०२६

3 वर्षांची असताना गिळलं टोपण... टीबी-दमा समजून डॉक्टरांनी 7 वर्षे केले चुकीचे उपचार, अखेर मुलीच्या फुप्फुसाचा भाग काढला

मुंबई। सततचा खोकला, वजन घटणे आणि वारंवार होणारा न्यूमोनिया... डॉक्टरांनी कधी क्षयरोग, तर कधी दमा असल्याचे सांगत उपचार केले. मात्र, तब्बल सात वर्षांनंतर तपासणी केली असता या सर्व त्रासामागचं खरं कारण समोर आलं. मुलीच्या फुप्फुसात लहानपणी पेनचं झाकण अडकून राहिलं होतं. उशिरा निदान झाल्यामुळे तिच्या फुप्फुसाचा एक भाग शस्त्रक्रिया करून काढावा लागला. मुंबईतील धारावी येथे राहणाऱ्या १० वर्षीय मायशा शेख हिच्यासोबत ही घटना घडली. अनेक वर्षे वेगवेगळे उपचार करूनही प्रकृती सुधारत नसल्याने अखेर तपासणीत धक्कादायक सत्य समोर आले.

टीबी आणि दमा समजून सुरू होते उपचार

मायशाला सतत खोकला, वजन कमी होणे आणि छातीच्या संसर्गाचा त्रास होत होता. सुरुवातीला अनेक डॉक्टरांनी तिला संसर्गजन्य आजार असल्याचा संशय व्यक्त करत अँटिबायोटिक्स दिली. त्यानंतर तिला मुंबई महापालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. थुंकीच्या तपासणीत ळ्ह आढळला नव्हता, तरीही लक्षणांच्या आधारे तिला क्षयरोगावरील औषधोपचार सुरू करण्यात आले. यानंतर एका खासगी रुग्णालयात तिला दमा असल्याचे सांगण्यात आले आणि इनहेलर देण्यात आला. मात्र, उपचार करूनही तिची प्रकृती सुधारत नव्हती.

सिटी स्कॅनमध्ये उलगडलं खरं कारण

अखेर मायशाला एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल (नारायणा हेल्थ) येथे नेण्यात आले. तेथे फुप्फुसरोगतज्ज्ञ डॉ. इंदू खोसला यांनी तिची तपासणी केली. सिटी स्कॅनमध्ये डाव्या फुप्फुसाचा काही भाग आकसल्याचे दिसून आले. त्यानंतर ब्रॉन्कोस्कोपी केली असता फुप्फुसाच्या आत खोलवर पेनचं झाकण अडकलेलं असल्याचं डॉक्टरांच्या लक्षात आलं.

हे झाकण सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी ईएनटी तज्ज्ञांची मदत घेण्यात आली. अतिरिक्त भूल देऊन अखेर पेनचं झाकण बाहेर काढण्यात डॉक्टरांना यश आलं.

फुप्फुसाचा भाग काढावा लागला

पेनचं झाकण काढल्यानंतर मायशाची प्रकृती सुधारू लागली. न्यूमोनियाही काही प्रमाणात कमी झाला. डॉक्टरांनी काही आठवडे फुप्फुस पूर्ववत होते का, याची वाट पाहिली. मात्र, दीर्घकाळ संसर्ग

मुंबईतील १० वर्षाच्या मुलीच्या फुप्फुसात तब्बल ७ वर्षे पेनचं झाकण अडकून राहिलं. टीबी आणि दमा समजून उपचार सुरू राहिले. अखेर शस्त्रक्रिया करून फुप्फुसाचा भाग काढावा लागला.

राहिल्यामुळे फुप्फुसाच्या एका भागाचं कायमस्वरूपी नुकसान झालं होतं. त्यामुळे अखेर शस्त्रक्रिया करून तिच्या फुप्फुसाचा जवळपास एक-तृतीयांश भाग काढावा लागला.


आता मुलगी सुरक्षित

डॉक्टरांच्या मते, शस्त्रक्रियेनंतर मायशा आता सामान्य आयुष्य जगू शकते. मात्र, योग्य वेळी अचूक निदान झाले असते, तर तिच्या फुप्फुसाचा भाग काढण्याची वेळ टळली असती. मायशाची आई मैमूना शेख यांनी सांगितले की, उपचारांवर किती खर्च झाला याचा आता हिशोबही राहिलेला नाही.



एका चुकीच्या निदानामुळे मुलीचा जीव धोक्यात आला होता, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

पत्नीचा जीव जात असताना मोबाईलमध्ये व्हिडिओ शूट... कृत्याने पोलिसही हादरले



प्राथमिक तपासानुसार, प्रवीणला पत्नीच्या विवाहबाह्य संबंधांचा संशय होता. यावरून दोघांमध्ये वारंवार वाद होत होते. गेल्या दीड महिन्यापासून भाग्यश्री माहेरी राहत होती. सोमवारी आरोपी आपल्या सासरी गेला आणि पत्नीला परत घरी घेऊन आला. त्यानंतर घरात दोघेच असताना ही घटना घडल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

वसई। विवाहबाह्य संबंधाचा संशय घेऊन पत्नीची हत्या केल्याप्रकरणी कर्नाटकातील बागलकोट जिल्ह्यात २९ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली आहे. धक्कादायक म्हणजे, पत्नी फासावर लटकलेल्या अवस्थेत मृत्युशी झुंज देत असतानाच तिचा व्हिडीओ शूट करून तो नातेवाईक आणि मित्रांना पाठवल्याचाही आरोप पोलिसांनी केला आहे. पीटीआयच्या वृत्तानुसार, मृत महिलेची ओळख भाग्यश्री जिगालूर अशी असून, सोमवारी (दि.२७) सायंकाळी बिलगी तालुक्यातील गलगली गावातील त्यांच्या घरात तिचा मृतदेह आढळला. महिलेच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी तिचा पती प्रवीण जिगालूर याच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. मृत्यूपूर्वीचा व्हिडीओ पाठवल्याचा आरोप पोलिसांच्या माहितीनुसार, पत्नी फासावर लटकलेल्या अवस्थेत असताना आरोपीने तिचा व्हिडीओ रेकॉर्ड केला. हा व्हिडीओ त्याने महिलेचे वडील, नातेवाईक आणि काही मित्रांना पाठवल्याचा आरोप आहे. पोलिसांनी आरोपीच्या मोबाईलमधील तसेच महिलेच्या मोबाईलमधील काही व्हिडीओ जप्त केले असून त्यांची तपासणी सुरू आहे. हत्या की आत्महत्या? तपास सुरू

महिलेच्या शरीरावर रक्ताचे डाग आणि दुखापतीच्या खुणा आढळल्याने पोलिस विविध शक्यतांचा तपास करत आहेत. आधी मारहाण करून गळफास दिला की मारहाणीनंतर तिने स्वतःच गळफास घेतला, याचा उलगडा अद्याप झालेला नाही. घटनास्थळावरून लोखंडी रॉडसारखे हत्यार जप्त करण्यात आलं असून, न्यायवैद्यकीय तपासणीसाठी पुरावे गोळा करण्यात आले आहेत. पोलिसांना घटनास्थळी बिअरच्या बाटल्याही आढळल्या आहेत. महिलेला मद्य किंवा अन्य गुंगीचं औषध देण्यात आलं होतं का, याचाही तपास सुरू आहे. शवविच्छेदनादरम्यान पोटातील नमुने जतन करून ते न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. चार वर्षांचा संसार, तीन वर्षांचा मुलगा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवीण आणि भाग्यश्री यांचं २०२० मध्ये लग्न झालं होतं. त्यांना तीन वर्षांचा मुलगा आहे. चालक म्हणून काम करणारा प्रवीण वारंवार बाहेरगावी जात असल्याने, त्याच काळात पत्नीचे दुसऱ्या व्यक्तीसोबत संबंध असल्याचा त्याला संशय आला होता, असा प्राथमिक तपासातून दावा करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू बागलकोटचे पोलिस अधीक्षक सिद्धार्थ गोयल यांनी सांगितले की, जप्त करण्यात आलेल्या व्हिडीओंची सत्यता, ते नेमके कधी चित्रीत करण्यात आले आणि घटनाक्रम काय होता, याचा तपास सुरू आहे. तसेच या दाम्पत्यातील वादांबाबत यापूर्वी ग्रामपंचायतीच्या बैठका झाल्या होत्या का, याचीही चौकशी केली जात आहे.

पोलिसांना पाठवलेल्या ईमेलमधून पोलखोल

धमकीचे तब्बल 1500 ईमेल पाठवणाऱ्या टेकीला अटक



मुंबई पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपीने त्याची ओळख लपवण्यासाठी विशेष सॉफ्टवेअर, सुरक्षित नेटवर्क आणि परदेशी सर्व्हरचा वापर केला. त्याने आउटलूक आणि हॉटमेलद्वारे बनावट ईमेल पाठवले, ज्यामुळे त्याची ओळख शोधणे कठीण झाले. यामुळे तपास यंत्रणांना बराच काळ कोणताही ठोस सुगावा लागला नाही. आठ महिन्यांपूर्वी, मुंबई पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने त्याला ईमेल पाठवून विचारले की तो सतत अशा धमक्या का पाठवत आहे. आरोपीने अविचाराने बनावट ईमेलऐवजी त्याच्या खऱ्या वैयक्तिक ईमेल खात्यावरून उत्तर दिले. हे उत्तर पोलिसांसाठी सर्वात मोठा सुगावा ठरले. त्यानंतर, तपास यंत्रणांनी सुमारे सहा महिने त्याच्या ऑनलाइन हालचालींवर लक्ष ठेवले आणि देशभरातील सर्व विमानतळांवर त्याच्या विरोधात सतर्कतेचा इशारा जारी केला.

मुंबई। अमेरिकेत अंदाजे 1.91 कोटी वार्षिक पगारावर काम करणारा एक भारतीय तंत्रज्ञान तज्ज्ञ अखेर पोलिसांच्या हाती लागला आहे. दोन वर्षांत, त्याने देशभरातील विमानतळे, शाळा, सरकारी कार्यालये, वित्तीय संस्था आणि इतर संवेदनशील ठिकाणी दीड हजाराहून अधिक धमकीचे ईमेल पाठवून सुरक्षा यंत्रणांना सतर्क केले होते. त्याची सर्वात मोठी चूक म्हणजे मुंबई पोलीस अधिकाऱ्याच्या ईमेलला वैयक्तिक ईमेल खात्यावरून उत्तर देणे. हेच उत्तर त्याच्या अटकेमागील मुख्य दुवा ठरले.

अटक करण्यात आलेल्या आरोपीची ओळख शरद सुब्रमण्यन शंकर, (तिरुनेलवेली, तामिळनाडू) अशी पटली आहे. गेल्या आठवड्यात अमेरिकेतून परतल्यानंतर तामिळनाडू पोलिसांनी त्याला चेन्नई विमानतळावर अटक केली. मुंबई पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपीने एकट्या मुंबईतील विविध संस्थांना 32 धमकीचे ईमेल पाठवले होते. आता, मुंबई गुन्हे शाखा त्याला चौकशीसाठी ताब्यात घेण्याची तयारी करत आहे.

मुंबई पोलिसांच्या म्हणण्यानुसार, शंकर दोन वर्षांपासून बनावट ईमेल पाठवून देशभरात दहशत पसरवत होता. प्रत्येक ईमेलमुळे इमारत रिकामी केली जात असे, बॉम्ब शोधक पथके आणि पोलीस पथके घटनास्थळी दाखल होत असत आणि तासनतास शोधमोहीम चालल असे. प्रत्येक धमकी नंतर खोटी असल्याचे निष्पन्न झाले, परंतु सुरक्षा यंत्रणेवर प्रचंड ताण आला, ज्यामुळे सामान्य लोकांच्या जीवनात व्यत्यय आला.

तपासात असे उघड झाले की, भारतीय व्यवस्थेतील कथित उणिवांमुळे आरोपी संतप्त होता. तो देशातील प्रमुख घटना आणि हाय-प्रोफाईल प्रकरणांवर सतत लक्ष ठेवत असे आणि त्या आधारावर धमकीचे ईमेल तयार करून ते पूर्णपणे खरे वाटावेत असे बनवत असे. तपास यंत्रणांना गोंधळात टाकण्यासाठी तो आपल्या ईमेलमध्ये प्रमुख राजकारणी, अभिनेते, वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि लोकप्रिय यूट्यूबर्स यांच्या नावांचा समावेश असलेले काल्पनिक षडयंत्राचे सिद्धांत लिहित असे.

10 जून रोजी बॉम्बे स्टॉक एक्सचेंजला (इए) पाठवलेल्या त्याच्या सर्वात अलीकडील ईमेलमध्ये, इमारतीत आरडीएक्स ठेवल्याचा दावा करण्यात आला होता. त्याने ईमेलच्या शेवटी केरळचे मुख्यमंत्री पिनारयी विजयन यांचे नाव समाविष्ट केले होते. यापूर्वी त्याने तामिळनाडूचे माजी उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन, आयपीएस अधिकारी जाफर सैत आणि यूट्यूबर सुवुकू शंकर यांच्यासह अनेक प्रमुख व्यक्तींची नावे वापरली होती.

शरद सुब्रमण्यम शंकर अमेरिकेतून चेन्नईत दाखल होताच, त्याच्या शोधासाठी जारी केलेल्या सूचनेमुळे सतर्कतेचा इशारा देण्यात आला आणि सुरक्षा यंत्रणांनी त्याला अटक केली. आरोपीला खात्री होती की त्याने आपली ओळख लपवण्यासाठी इतकी मजबूत डिजिटल प्रणाली तयार केली आहे की पोलीस त्याच्यापर्यंत कधीही पोहोचू शकणार नाहीत. पण मुंबई पोलिसांच्या एका अधिकाऱ्याला पाठवलेला एक प्रत्युत्तर ईमेल ही त्याची सर्वात मोठी चूक ठरली, ज्यामुळे देशभरात 1500 हून अधिक धमकीचे ईमेल पाठवल्यानंतर त्याला तुरुंगात जावे लागले.

खिचडीत जिवंत अळी तर बिर्याणीत माशी, नागरिकांच्या जीवाशी खेळ, मालकांचे धाबे दणाणले

एफडीएकडून नांदेडमध्ये प्रसिद्ध हॉटेल्सचे परवाने रद्द

नांदेड। हॉटेलमधील अस्वच्छता आणि नियमांचं उल्लंघण करणं दोन हॉटेल चालकांना चांगलंच भोवलं आहे. अस्वच्छता आणि अनियमितता आढळून आल्याने नांदेड शहरातील हॉटेल सवेरा आणि हॉटेल कविता या दोन हॉटेल्सचे थेट परवाने रद्द करण्यात आले आहेत. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली एफडीएच्या पथकानं ही कारवाई केली आहे. तर एका हॉटेलवर कारवाईची टांगती तलवार कायम आहे. एफडीएच्या या कारवाईमुळे शहरातील नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्या हॉटेल चालकांचे धाबे दणाणले आहेत. खिचडीमध्ये जिवंत अळी गंभीर त्रुटी आढळून आल्यानं संबंधित आस्थापनेचा अन्न परवाना पुढील आदेशापर्यंत



तात्काळ निलंबित करण्यात आला आहे. तसेच खिचडी भज्जेसाठी प्रसिद्ध असलेल्या हॉटेल कविता या आस्थापनेचाही अन्न परवाना गंभीर अनियमिततेमुळे निलंबित करण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनानं दिली आहे. विशेष म्हणजे कविता हॉटेलमध्ये काही दिवसापूर्वी खिचडीमध्ये जिवंत अळी आढळली होती. सोशल मीडियावर व्हिडीओ देखील व्हायरल झाला होता. त्यानुसार एफडीएनं हॉटेलचा परवाना रद्द केला आहे. याशिवाय अन्य एका हॉटेलमध्ये बियार्णीत मृत माशी आढळून आल्याची ऑनलाईन तक्रार ग्राहकानं केली होती, त्यानुसार पथकाने हॉटेलची तपासणी केली. तपासणीसाठी नमुने देखील घेतले. अहवाल आल्यानंतर या हॉटेलवर कारवाई केली जाणार असल्याची माहिती संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठाही जप्त याशिवाय ताडी दुकान क्रमांक 12, नवा मोंढा, नांदेड येथून 158 लिटर साठा (किंमत 7 हजार 110 रुपये) जप्त करून नष्ट करण्यात आला. संबंधित व्यावसायिकाकडे खरेदी बिल अथवा वाहतूक परवाना (ट्रान्सपोर्ट पास) उपलब्ध नसल्याने आणि गंभीर त्रुटी आढळल्यामुळे या आस्थापनेचाही अन्न परवाना तत्काळ निलंबित करण्यात आला. मोहिमेदरम्यान विविध औद्योगिक आस्थापनांमधून मोठ्या प्रमाणात रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठाही जप्त करण्यात आला. त्यामध्ये श्री स्वामी समर्थ ऑईल ट्रेडिंग, एमआयडीसी, नांदेड येथून 3 हजार 148 लिटर (किंमत 5 लाख 19 हजार 420 रुपये), श्रीनिवास ऑईल अँड फूड्स, हदगाव येथून 1 हजार 363 लिटर (किंमत 2 लाख 45 हजार 340 रुपये), ज्ञानाई स्पाईसेस, कृष्णूर एमआयडीसी, नायगाव येथून 1 हजार 61 लिटर (किंमत 3 लाख 53 हजार 800 रुपये) तसेच आयुष ओमकार इंडस्ट्रीज, एमआयडीसी, नांदेड येथून 1 हजार 78 किलोग्रॅम रिफाइंड सोयाबीन तेल (किंमत 1 लाख 86 हजार 494 रुपये) जप्त करण्यात आले. अन्न व औषध प्रशासनाचा इशारा नांदेड शहर व जिल्ह्यातील सर्व हॉटेल, उपहारगृह, खाद्यगृह आणि अन्न सेवा आस्थापनांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, 2006 तसेच संबंधित नियमांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे.

वसईतील रिसॉर्टमध्ये मद्यधुंद पर्यटकाचा हवेत गोळीबार

वसई : वसईतील कळंब समुद्रकिर्नायावरील एका रिसॉर्टमध्ये मद्यधुंद पर्यटकाने बेकायदेशीर पिस्तुलातून हवेत गोळीबार केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (२९ जुलै) पहाटे घडली. गोळीबाराचा आवाज ऐकताच अनार्ळा सागरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपीला अटक केली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कळंब समुद्रकिर्नायावरील तुलसी रिसॉर्टमध्ये मंगळवारी रात्री भिवंडी येथून काही पर्यटक पाटीर्साठी आले होते. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या पार्टीदरम्यान मद्याच्या नशेत संदेश गुरव (३२) याने जवळील बेकायदेशीर गावठी पिस्तूल बाहेर काढून हवेत गोळीबार केला.गोळीबाराचा आवाज ऐकताच परिसरात गस्त घालत असलेल्या अनार्ळा सागरी पोलिसांच्या बीट मार्शलने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सुरुवातीला रिसॉर्ट मधील उपस्थितांनी गोळीबार झाल्याचे नाकारले. मात्र पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता तेथे गोळीचे रिकामे काडतूस आढळून आले. त्यानंतर करण्यात आलेल्या चौकशीत गोळीबार झाल्याचे स्पष्ट झाले. आरोपी संदेश गुरव हा भिवंडी येथील बिल्डिंग मटेरियलचा व्यवसाय करत असून तो मित्रांसोबत रिसॉर्टमध्ये पाटीर्साठी आला होता. मद्यधुंद अवस्थेत त्याने हा प्रकार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. याप्रकरणी अनार्ळा सागरी पोलिसांनी शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम ३ व २५ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १२५ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडील पिस्तूल बेकायदेशीर असल्याने ते त्याच्यापर्यंत कसे पोहोचले याचाही तपास सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांनी दिली.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com